महाराष्ट्र शासन

क्रमांक-जशिअ-२०१७/प्र.क्र.३७१/जल-७
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १३ जुलै,२०१७.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी ,

विषय :- जलयुक्त शिवार अभियान.
अभियान सन २०१७-१८ या वर्षाकरिता टंचाईमुक्त करण्यासाठी निवड करण्यात आलेल्या गावांसदर्भात नियोजन - कालबध्द कार्यक्रम.

जलयुक्त शिवार अभियान या कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ या वर्षी टंचाई मुक्त करण्याकरिता निवडण्यात आलेल्या गावातील कामे गाव स्तरीय पाणलोट ((treatment potential map) तयार करुन या संदर्भात ग्राम स्तरीय पथकांना ३ दिवसाचे निवासी प्रशिक्षण देण्याचे तसेच तांत्रिक कार्यशाळांमध्ये मार्गदर्शन करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला असून या अनुषंगाने सन २०१७-१८ या वर्षी निवडण्यात आलेल्या गावामधील कामकाजाचे नियोजन करण्याबाबत खालील प्रमाणे कालबध्द कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे. :-

| अ.क्र. | कालावधी | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | दि. १ जुलै ते दि.३० ऑगस्ट | सन २०१७-१८ मधील गावस्तरीय पाणलोटाचे (Treatment Potential Map) तयार करुन ग्रामस्तरावर उपलब्ध करुन देणे. |
| २ | दि.१५ जुलै ते दि.१५ सप्टेंबर | ग्रामस्तरीय पथकांचे ३ दिवसांचे निवासी प्रशिक्षण आयोजित करणे |
| ३ | दि.१५ सप्टेंबर ते दि.३० सप्टेंबर. | विभाग स्तरीय तांत्रिक कार्यशाळा आयोजित करुन प्रशिक्षण देणे. |
| ४ | दि.१५ सप्टेंबर ते दि.३० सप्टेंबर | Treatment Potential Map व शिवार फेरीच्या आधारे गाव आराखडा निश्चित करणे . |
| ५ | दि. २ ऑक्टोबर ,२०१७ | ग्राम सभेमध्ये आराखडयाला मान्यता देणे. |
| ६ | दि. २ ऑक्टोबर,२०१७ ते ३० ऑक्टोबर ,२०१७. | • आराखडयास तालुका व जिल्हास्तरीय समितीची मान्यता घे<br>• सर्वेक्षण /अंदाजपत्रके तयार करणे.<br>• गावनिहाय Net Planning करुन त्याला जिल्हयास्तरीय समितीची मान्यता घेणे<br>• सक्षम अधिकाऱ्याने प्रशासकीय मान्यता देणे. |
| ७ | दि. १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर | निविदा प्रक्रिया करणे व कार्यारंभ आदेश देणे |
| ८ | दि. १५ नोव्हेंबर ते दि.१५ जून | प्रकल्प पूर्ण करण्याच कालावधी . |

वरील अनुक्रमांक (१) ते (३) येथील बाबींवर शासन स्तरावरुन कार्यवाही करण्यात येत असून उर्वरित बाबींवर संबंधित क्षेत्रिय यंत्रणांकडून कार्यवाही अपेक्षित आहे. आपणास कळविण्यात येते की, वर नमूद करण्यात आलेल्या कालबध्द कार्यक्रमानुसार विहीत समय मर्यादेत आपणाकडून अपेक्षित असलेली सर्व कार्यवाही करण्यात यावी.

(वि.सि.वखारे)
सह सचिव ,महाराष्ट्र शासन.

LETTER